**<u>सं.फौ.ख.क्र.०६/२०२४ मधील निशाणी ५ आदेश</u>**

साक्षीदार हजर. साक्षीदार शपथेवरती शपथपत्रातील मजकूर त्याच्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर असल्याचे सांगून त्यावर त्याची सही असल्याचे मान्य करतो. करीता, पुराव्याचे शपथपत्र पुराव्याकामी वाचण्यात येते.

**<u>शपथेवरती तक्रारदारतर्फे अतिरीक्त सरतपास विधीज्ञ श्री.एच.एल.गोवेकर यांचे मार्फत</u>**

१०. मला आता नि.क्र.३/२ वरील धनादेश दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही आहे. सदरची सही माझ्या समक्ष केल्यामुळे मी आरोपीची सही ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१३</u>** दिली आहे. मला आता नि.क्र.३/३ वरील बँक रिटर्न मेमो दाखविण्यात आला. कलम १४६ पराक्रम्य संलेख अधिनियमातील गृहीतकाप्रमाणे त्यास **<u>नि.क्र.१४</u>** दिली आहे. मला आता नि.क्र.३/५ वरील दि.०२/११/२०२३ रोजीची नोटीस दाखविण्यात आली. त्यावर बँकेच्या वकिलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१५</u>** दिली आहे. मला आता नि.क्र.३/६ वरील पोस्टाची पावती दाखविण्यात आली. त्यास **<u>नि.क्र.१६</u>** दिली आहे. मला आता नि.क्र.३/७ वरील पोस्टाची पोहोच पावती दाखविण्यात आली. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१७</u>** दिली आहे. मला आता नि.क्र.३/९ वरील बँकेचा ठराव दाखविण्यात आला. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सही आहे. मी त्यांची सही ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१८</u>** दिली आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एस.गावडे यांचे मार्फत</u>**

नि.क्र.१९ वरील आदेशाप्रमाणे **उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

ठिकाण : मालवण
दिनांक : ३०/०४/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण